www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज

# युवक आधार

मराठी



दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर



मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १४० वा सोमवार दि. 03 फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514


## विवेकानंद शाळेतील आरोही पाडेवार हिने अबॅकस कॉम्प्युटिशन स्पर्धेत स्पर्धेत पटकावला दुसरा क्रमांक...

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

परतूर येथील विवेकानंद प्राथमिक शाळेमध्ये शिकणारी आरोही अरुण पाडेवार या विद्यार्थिनीने कोल्हापूर येथे झालेल्या अबॅकस कॉम्प्युटिशन स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावत यश संपादन केलं आहे.गणित विषयाची 100 मार्काची परीक्षा सहा मिनिटात 100 प्रश्न सोडवायचे होते तिने ते फक्त 4 मिनिटात सोडूवून शंभर पैकी 99 मार्क घेत दुसरा क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल आजी लक्ष्मीबाई साळवे,आजोबा झुंगाराम साळवे, भगवान साळवे, भीमराव साळवे, विजय ससाळे, संजय गायकवाड, सुवर्ण गायकवाड, वच्छलाबाई गायकवाड, लड्डू गायकवाड, हर्षदा साळवे, दिलीप साळवे प्रदीप साळवे, चंद्रकांत साबळे, माया साबळे, सुनिता पाडेवार, सोनाजी पाडेवार यांनी तिचे अभिनंदन केले आहे व पुढील आयुष्यासाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत तिच्या या यशाचे सर्व श्रेय तिचे शिक्षक उमेश कुमावत यांना जात असल्याच मत तिची आई सविता पाडेवार व वडील अरुण पाडेवार यांनी व्यक्त केले आहे.



## पुण्याचा पृथ्वीराज मोहोळ ठरला महाराष्ट्र केसरी २०२५ चा मानकरी; महेंद्र गायकवाड पराभूत

पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळला यंदाचा महाराष्ट्र केसरीचा किताब मिळाला आहे. सोलापुरचा कुस्तीपटू महेंद्र गायकवाड याला पराभूत करत पृथ्वीराज मोहोळ महाराष्ट्र केसरी ठरला आहे. मॅटवर घडलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळनं महाराष्ट्र केसरीची गदा जिंकली. दोन गुण मिळवत पृथ्वीराजने महेंद्र गायकवाड याला पराभूत केलं. अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या ६७ व्या महाराष्ट्र केसरीच्या अंतिम स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळने महेंद्र गायकवाडचा पराभव केला. एका गुणाने महेंद्रचा पराभव करत पृथ्वीराज मोहोळने महाराष्ट्र केसरीचा खिताब पटकावला. या विजयानंतर पृथ्वीराज मोहोळच्या समर्थकांनी एकच जल्लोष केला. त्यानंतर पृथ्वीराजने त्याच्या वडिलांना खांद्यावर उचलून घेत आपला आनंद व्यक्त केला. ६७व्या महाराष्ट्र केसरी किताब स्पर्धेची अंतिम लढत पृथ्वीराज मोहोळ आणि महेंद्र गायकवाड यांच्यामध्ये झाली. अंतिम स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळला पहिला पॉईंट मिळाला. नंतर दुसरा पॉईंट महेंद्र गायकवाडने मिळवला आणि बरोबरी केली. त्यानंतर पृथ्वीराज मोहोळने पुन्हा एकदा एक पॉईंट घेतला आणि सामना जिंकला. सामन्याच्या दरम्यान काही प्रेक्षकांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी लगेच हस्तक्षेप करून त्यांना



बाजूला केलं. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पृथ्वीराजला महाराष्ट्र केसरी स्पर्धेची मानाची गदा देण्यात आली. अंतिम स्पर्धेतील दोघेही स्पर्धक तुल्यबल असल्याने हा सामना अधिक रंगतदार बनला होता. गादी गटातून पृथ्वीराज मोहोळ आणि माती गटातून महेंद्र गायकवाड हा अंतिम सामन्यात पोहोचला होता. यानंतर महेंद्र गायकवाड आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्यात अंतिम सामन्याचा थरार रंगला. चितपट न होता २-१ गुणांच्या फरकाने पृथ्वीराज मोहोळने ही कुस्ती जिंकत महाराष्ट्र केसरी किताब पटकावला. कुस्तीला सुरवात झाल्यानंतरच महेंद्र गायकवाडची जर्सी फाटली आणि ती बदल्यासाठी त्याने थोडा वेळ घेतला. त्यानंतर लढत सुरु होताच पृथ्वीराजने एक गुण मिळवला. त्यानंतर वरचढ ठरत असलेल्या पृथ्वीराजने दुसरा गुण मिळवला. त्यानंतर महेंद्रनेही एक गुण मिळवला. मात्र पृथ्वीराजच्या दुसऱ्या गुणावर महेंद्रने नाराजी दाखवली आणि शेवटी महेंद्रने मैदान सोडले. त्यानंतर पृथ्वीराजला विजयी घोषित करण्यात आलं.

## माघी गणेश जयंती .सुदेश रमेश पाटील यांच्या निवासस्थानी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**सायली साळुंके /उरण**



गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया असं म्हणत आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये पहिला पुजेचा मान हा गणरायाचा आहे. कोणतेही कार्य असो आपण गणपतीची पुजा प्रथम करतो. हा विघ्नहर्ता आहे त्यामुळे आपल्या कार्यामधील प्रत्येक विघ्न तो दूर करतो अशी मान्यता आहे. श्री गणेश जयंती निमित्त दि.1-2-25 रोजी रायगड जिल्हा सरचिटणीस संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना श्री.सुदेश रमेश पाटील यांच्या निवासस्थानी श्री. गणेशाचे आगमन धुमधंद्याक्यात झाले असता ह्या शुभदिनी भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष मा. श्री. अविनाश कोळी साहेबांनी श्री.सुदेश पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली व बाप्पाचे दर्शन घेतले. त्यांच्या समवेत पुर्व विभाग अध्यक्ष श्री. शशी दादा पाटिल आणि श्री. करण ठाकूर, श्री.धनेश भाऊ उपस्थित होते. माघी गणेश जयंती सगळीकडे उत्साहात आणि जल्लोषात साजरी केली जाणार आहे. गणेश जयंतीला विनायकी चतुर्थी किंवा तिलकुंद चतुर्थी या नावानेही ओखळलं जातं. महाराष्ट्रात या दिवशी अनेक ठिकाणी तसेच काही घरांमध्ये ही दीड दिवसांसाठी गणपती बाप्पाचे घरी आगमन होते. काही सावर्जनिक गणेश मंडळही बाप्पाची प्राणप्रतिष्ठा दीड दिवसांसाठी करतात. या दिवशी श्रीगणरायाची विधिवत पूजा करून व्रत केल्यास प्रत्येक इच्छा पूर्ण होतात तसेच जीवनात सुख-समृद्धी कायम टिकून राहते असे म्हटले जाते.

## सिद्ध संत मिराबाई आईसाहेब पुण्यतिथी सोहळया निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**



- संपूर्ण राज्यात प्रसिद्ध असलेल्या महिलांची पंढरी म्हणून ओळख असलेल्या पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र संत मिराबाई आईसाहेब संस्थान महासांगवी या ठिकाणी सिद्ध संत मिराबाई आईसाहेब यांच्या २७ व्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्त आज सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी२०२५ पर्यंत सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी या निमित्त हरिनामाचा जागर होणार आहे. या मध्ये नामवंत किर्तनकार आपली सेवा देणार असून दिनांक १० फेब्रुवारी रोजी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे देखील सांगता सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. संस्थानाच्या मठाधिपती महंत ह.भ.प.राधाताई महाराज आईसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील ७ दिवस या ठिकाणी धर्म जागर होणार असून या सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. पाटोदा तालुक्यातील सिद्ध संत मिराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे यंदा २७ वे वर्ष असून गतवर्षी या ठिकाणी विशेष असा महिला अखंड हरिनाम सप्ताह संपन्न झाला होता. यंदाच्या सप्ताहात महंत राधाताई महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ७ दिवस धर्म जागर होणार असून आज दिनांक ३ फेब्रुवारी सोमवार रोजी या ठिकाणी सप्ताह कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. त्या निमित्ताने या ठिकाणी दररोज अंजलीताई केंद्रे यांच्या शिवमहापुराण कथेचे देखील आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार पांडुरंग महाराज शास्त्री, नंदिनीताई महाराज मैंद, कांचन महाराज जगताप, प्रकाश महाराज साठे, डॉक्टर तुळशीराम महाराज गुट्टे, निवृत्ती महाराज इंदुरीकर, ज्ञानेश्वर महाराज जळकेकर या नामवंत किर्तनकार आपली किर्तन सेवा अर्पण करणार आहेत. याच प्रमाणे या ठिकाणी पंचकुंडी महायज्ञ सोहळा व भगवान शंकराच्या प्राणप्रतिष्ठा मूर्ती सोहळा देखील आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन महंत ह.भ.प.राधाताई महाराज यांनी केले आहे.ब

## पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिवस साजरा




दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर

महाराष्ट्र शासन,क्षत्रिय कार्यालयांसाठी 100 दिवसांच्या कृती आराखडा च्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार निवारण दिवस घेण्यात आला. तक्रार निवारण दिनाच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील 25 ते 30 तक्रारदार उपस्थित होते. नमूद उपस्थित तक्रारदार यांच्या तक्रारी जाणून घेऊन सदर तक्रारीचे निरसन करण्यात आले. सदर वेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह सपोनि केदार, सपोनि पवार, पोउपनि कदम, पोउपनि सोळंके हे उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना सायबर फ्रॉड, डायल 112, व्हाट्सअप चॅनल व नवीन कायद्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## इंडियन नॅशनल ऑटोक्रॉस चॅम्पियनशिप 2024 कार रेसिंग स्पर्धेत कुशल चौधरी आला दोन्ही फायनल राऊंडमध्ये प्रथम

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

चेन्नई येथे पार पडलेल्या इंडियन नॅशनल ऑटोक्रॉस चॅम्पियनशिप 2024 कार रेसिंग स्पर्धेत नवीन पनवेलमधील कुशल(बंटी) सुरेश चौधरी यांनी दोन्ही फायनल राऊंड मध्ये संपूर्ण भारतातून पहिला येण्याचा मान पटकवून तमाम पनवेलकरांचे नावलौकीक भारतभर केले. याबद्दल त्यांचे घरी जावून अभिनंदन करताना मा नगरसेवक तथा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड मनोज भुजबळ, ओबीसी मोर्चा, सोशल मीडिया जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, कुशल चौधरी यांचे वडील सुरेश चौधरी भाऊ विशाल चौधरी आणि कल्पेश चौधरी आदी उपस्थित होते.

## सुनिल पाटील आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/ प्रतिनिधी**



आदर्श मुंबई विभूती फाउंडेशन एशियन टॅलेंट गोल्डन अवॉर्ड रायगड जिल्ह्यातील वेध विकासाचे प्रिंट डिजिटल चे संपादक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पनवेल तालुका अध्यक्ष सुनील पाटील यांना आदर्श पत्रकार पुरस्कार विक्रोळी येथे देण्यात आला. नेहमी समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून निकोप व उत्कृष्ट समाज निर्मितीसाठी झटत असलेल्या त्यांचे कार्य समाजाला नेहमीच प्रेरणादायी ठरत असतात. आपल्या साप्ताहिक वेध विकासाच्या प्रिंट आणि डिजिटल च्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे काम या वर्तमानपत्रातून केले जाते . नेहमीच सामाजिक शैक्षणिक कला क्रीडा क्षेत्रामध्ये अग्रेसर असणारे, समाजाला नेहमीच प्रेरणादायी ठरणारे, इतर कोणत्याही घटकांच्या उन्नतीसाठी दिशादर्शक ठरत निस्पृह निस्वार्थी समाजसेवेसाठी झटणारे पत्रकार सुनील पाटील यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना विक्रोळी येथे एशियन टॅलेंट गोल्डन अवॉर्ड आदर्श पत्रकार म्हणून पुरस्काराने गौरविण्यात आले.यावेळी भारतीय सिमेवरील कमांडर मधुसुदन सुर्वे, न्युज 18 च्या वृत्त निवेदिका गार्गी गोरेगावकर, चारुशीला घरत मा. नगराध्यक्षा यांच्याहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## कळंबोलीत पर्यावरणस्नेही हळदी कुंकू!

### आशीर्वाद सोसायटीत तुळशीचे रोप संक्रांत वाण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

सध्या ठीक ठिकाणी हळदी कुंकू समारंभ आयोजित केले जातात. विविध सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, निवडणुकीसाठी असलेले इच्छुक उमेदवार याकरता अग्रभागी असतात. त्याचबरोबर विविध गृहनिर्माण संस्थांमध्येही हा कार्यक्रम पार पडतो. शनिवारी कळंबोली सेक्टर 14 येथील आशीर्वाद सोसायटीमध्येही सुहासिनींच्या जिव्हाळ्याचा हा उपक्रम पार पडला. विशेष म्हणजे यावेळी सहभागी झालेल्या महिला भगिनींना संक्रांत वाण म्हणून तुळशीचे रोप देऊन एक प्रकारे पर्यावरण स्नेही संदेश देण्यात आला. नवीन वर्षाच्या सुरुवातीला येणारा पहिला सण 'मकर संक्रांत' होय. सुगड पुजण्यापासून पुढील 15 दिवस हळदी कुंकवाचे कार्यक्रम सुरू होतात. पण, सगळ्याच महिलांना उत्सुकता असते की, हळदी कुंकवाला वाण म्हणून कोणती वस्तू मिळणार. यासाठी आयोजकांच्या वतीने वेगवेगळे पर्याय शोधले जातात. मात्र कळंबोलीतील आशीर्वाद सोसायटीच्या महिला आयोजकांनी हळदी कुंकू समारंभामध्ये सहभागी झालेल्या सुहासिनींना तुळशीचे रोप देऊन 'झाडे लावा झाडे जगवा' हा एक पर्यावरणपूरक संदेश दिला. तुळशीचे रोप भारतात जवळपास प्रत्येक घरात आढळते. ग्रामीण भागामध्ये तर तुळशी वृंदावन घरासमोर असते. या पवित्र वनस्पतीला केवळ आरोग्य लाभच नाही तर हिंदू संस्कृतीतही खूप महत्त्व आहेच तसेच तुळशी मातेची पूजाही केली जाते. तुळशीला त्याच्या असंख्य आरोग्य फायद्यांसाठी औषधी वनस्पतींची राणी म्हणून ओळखले जाते. या वृक्षाला आयुर्वेदातही खूप महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही हळदीकुंकू समारंभामध्ये तुळशीचे रोप वाण म्हणून दिले असल्याचे आशीर्वाद सोसायटीतील महिला सदस्यांनी सांगितले.



## नावासमोर डॉक्टर लागलं आई-वडिलांची इच्छा पूर्ण झाली

### उदय सामंत भावूक झाले

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी संतोष लांडे




पुणे दिनांक १ फेब्रुवारी - डॉ. उदय सामंत राज्याचे उद्योग व मराठी भाषा विभाग मंत्री उदय सामंत यांना आज अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. या सन्मानाने भावूक होत उदय सामंत यांनी आपल्या आई-वडिलांची इच्छा पूर्ण झाल्याची भावना व्यक्त केली. अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या विशेष दीक्षांत समारंभात मंत्री उदय सामंत यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. या सोहळ्याला विद्यापीठाचे संस्थापक डॉ. अजिंक्य डी.वाय. पाटील, विद्यापीठाचे अधिकारी, विद्यार्थी आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आणि उदय सामंत भावूक झाले!**

डॉक्टरेट मिळाल्यानंतर झालेल्या सत्कार समारंभात बोलताना उदय सामंत म्हणाले की, "आजपासून माझ्या नावासमोर 'डॉ.' लागले आहे. माझ्या आई-वडिलांची इच्छा होती की, मी एमबीबीएस करून डॉक्टर व्हावं, पण नियतीने मला वेगळ्या मार्गावर आणले. समाजासाठी आणि राज्यासाठी कार्य करताना आज विद्यापीठाने माझ्या कार्याची दखल घेतली, याचा मला अभिमान वाटतो." त्यांनी आपल्या भाषणात आपल्या राजकीय प्रवासाचा आणि शिक्षणक्षेत्रातील योगदानाचा उल्लेख केला. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मंत्रिपदाच्या काळात त्यांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांची आठवण त्यांनी करून दिली. "कोरोना काळात परीक्षा घ्यायच्या की नाही, हा प्रश्न उभा राहिला होता. तेव्हा मी विद्यार्थ्यांच्या मतांचा विचार करून परीक्षा रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी माझे आभार मानले होते. तो निर्णय माझ्या कारकिर्दीतील सर्वात मोठ्या निर्णयांपैकी एक होता," असे ते म्हणाले. परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयानंतर दुसऱ्या दिवशी अनेक विद्यार्थ्यांसाठी मी देव बनलो. अनेक विद्यार्थ्यांना उदय सामंत कळायला लागला. आणि जिल्ह्याच्या कानाकोपर्यात गेल्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात गेल्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा मंत्री आला. हेच सांगण्याऐवजी विद्यार्थी सांगायला लागले की परीक्षा रद्द करणारा मंत्री आला. आणि ती जी काही मला प्रसिद्धी मिळाली त्या ऐतिहासिक निर्णयानंतर त्याला तोड कुठच्याही माझ्या निर्णयामध्ये येऊ शकत नाही. आणि म्हणून मला असं वाटतं की तो ज्यावेळी निर्णय घेतला तो महाराष्ट्राच्या हिताचा होता विद्यार्थ्यांच्या हिताचा होता असं ही सामंत यांनी स्पष्ट केलं.

**मराठी भाषा आणि शिक्षण क्षेत्रात योगदानाचा संकल्प**

उद्योग मंत्री म्हणून महाराष्ट्रात रोजगारनिर्मितीवर भर देत असल्याचे सांगत त्यांनी पंधरा लाख सत्तर हजार कोटींचे गुंतवणूक करार (MOU) केले असल्याचे जाहीर केले. तसेच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि परदेशी विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्यासाठी अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाबरोबर विशेष अभ्यासक्रम सुरू करण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. "माझी इच्छा आहे की, परदेशातील मराठी मुलांना मातृभाषेचा अभिमान वाटावा आणि ती सहज शिकता यावी. यासाठी विद्यापीठाबरोबर लवकरच पाऊले उचलली जातील," असे उदय सामंत यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे आणि संस्थापक अजिंक्य डी.वाय. पाटील तसेच डी.वाय पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानले. "या विद्यापीठाने आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण आणि संस्कार दिले आहेत. अशा प्रतिष्ठित संस्थेकडून सन्मान मिळणे ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे," असे उदय सामंत यांनी नमूद केले. राजकारणाची पार्श्वभूमी नसताना, तसंच घरात कोणीही साधं ग्रामपंचायत सदस्यही नसताना आपण हे यश गाठू शकलो कारण राज्यातील आणि रत्नागिरीतील जनता माझ्या पाठीशी होती अशी आठवण सांगताना आपण ज्या क्षेत्रात काम कराल त्या क्षेत्राचं नावलौकिक आपल्यामुळे वाढलं पाहिजे या भावनेतून काम करा असा संदेश ही उदय सामंत यांनी विद्यार्थ्यांना दिला. हा सन्मान उदय सामंत यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन देण्यात आला. त्यांच्या या यशस्वी प्रवासासाठी विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## श्री गणपती देवस्थान ट्रस्ट बोकडवीरा यांच्या वतीने श्री गणेशमंदिरात

### श्री गणेशजन्मोत्सव मोठया जल्लोषात साजरा





**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

बोकडवीरा येथील श्री गणेश मंदिरात प्रती वर्षा प्रमाणे पारंपारिक पद्धतीने श्रीगणेश जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.बरोबरीने 2000 साली संकल्पना साकारून श्री गणेश मंदिराचा जिर्णोधारकरण्यात आला होता त्याचा 20 वर्धापनदिन ही साजरा करण्यात आला.सिडको निर्मित उरण-द्रोणागिरी नोड शहरात हे मंदिर असून हे मंदिर सुमारे 250 वर्षापेक्षा अधिक पुरातन आहे. प्रतिवर्ष प्रमाणे माघ शुद्ध-3 शके 1946 शनिवार दि 31 जानेवारी 2025 रोजी 20 वर्धापनदिनाचे औचित्य साधून पहाटे श्रींच्या मूर्तीस महाभिषेक व विधी पूर्वक पुजाअर्चा करून सौ.कामिनी ठाकूर यांच्या हास्ते वर्धापनदिन सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.या दिवशी राजेंद्र पाटील,गणेश ठाकूर,रविंद्र तांडेल,हरेश पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या महा प्रसादाचालाभ ग्रामस्थान समवेत पंचक्रोशींतील भाविकांनी घेतला तर रात्रो "परंपरा आगरी कोळ्याची हा सांस्कृतिककार्यक्रम सादर करण्यात आला. तर 1 फेब्रुवारी रोजी श्री गणपती देवस्थानचे अध्यक्ष मनोज पाटील यांच्या हस्ते जन्मोत्सव सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.या दिवशी दिवसभरात मंदिरात ह.भ.प. ओमकार गदरे यांचे कीर्तन.श्रीं चा जन्म सोहळा,हळदीकंकू,ज्ञानेश्वर हरिपाठश्री गजानन प्रासादिक भजन मंडळ बोकाडवीरा यांचे भजन सायंकाळी महा आरती,स्वागत-सत्कार समारंभ आदी कार्यक्रम साजरे करण्या आले, अनेक मान्यवरांसमवेत पंचक्रोशिंतील भाविकांनी मंदिरात येऊन श्रींच्या दर्शनाचा व महा प्रसादाचा लाभ घेतला,रात्रो 10 वाजल्या नंतर श्रींची पालखी काढण्यात येऊन ती संपूर्ण गावातून फिरविण्यात आली दुपारी उशिरापर्यंत ही पालखी श्री गणेश मंदिरात पोहचली

युवक आधार

सोमवार दि. ०३ फेब्रुवारी २०२५


# संपादकीय

**संत तुकाराम महाराज जयंतीनिमित्त विशेष लेख)**

**लोककल्याणकारी क्रांतिकारक संत तुकाराम महाराज**

संत तुकाराम महाराज यांचा जन्म 2 फेब्रुवारी 1608 रोजी पुणे जिल्ह्यातील देहू या गावी झाला. देहू हे गाव इंद्रायणी नदीच्या उजव्या काठावर आहे. संत तुकाराम महाराज यांचे वाडवडील हे मनोभावे वारकरी संप्रदाय आचरणारे होते. त्यांच्या मागील आठ पिढ्यापासून ते विठ्ठल भक्त होते. संत तुकाराम महाराज हे मोरे घराण्यातील आहेत. आंबिले हे त्यांचे उपनाम आहे. संत तुकाराम महाराजांच्या वडिलांचे नाव बोल्होबा तर आईचे नाव कनकाई होते.

संत तुकाराम महाराजांना दोन भाऊ होते. मोठा सावजी आणि धाकटा कान्होबा. तुकोबा हे आपल्या भावंडांवर जीवापाड प्रेम करत असत. मोठा भाऊ सावजी हा लहानपणापासूनच अत्यंत चिंतनशील आणि संवेदनशील मनाचा होता. ऐन तारुण्यामध्ये त्याने सर्वसंगपरित्याग केला. त्याला विरक्ती प्राप्त झाली. त्याने गृहत्याग करून परमार्थाचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे कुमार वयातच संत तुकाराम महाराजांवर संसाराची जबाबदारी पडली. संत तुकाराम महाराजांचे घराणे हे सधन शेतकऱ्याचे घराणे होते. त्यांचे वाडवडील हे सावकार आणि महाजन होते. महाजन म्हणजे बाजारातील वजन- मापे यावरती नियंत्रण ठेवणारे व बाजारपेठेतील कर वसूल करणारा अधिकारी होय. संत तुकाराम महाराजांनी पारंपारिक सावकारकी बंद केली. त्यांचे किराणा मालाचे दुकान होते, तसेच ते नामवंत शेतकरी होते. संत तुकाराम महाराजांच्या पहिल्या पत्नीचे नाव रखुमाई, तर दुसऱ्या पत्नीचे नाव अवलाई तथा जिजाई होते. संत तुकाराम महाराजांच्या काळात मोठा दुष्काळ पडला होता. त्याप्रसंगी त्यांनी गोरगरिबांना धनधान्याचे मोफत वाटप केले. ते अत्यंत प्रेमळ आणि संवेदनशील मनाचे होते.

जे का रंजले गांजले।  
त्यासी म्हणे जो आपुले।  
तोचि साधू ओळखावा।  
देव तेथेची जाणावा ।

ही त्यांची साधू आणि देव याबाबतची धारणा होती. गोरगरिबांना मदत करणे, हाच खरा धर्म आहे. हे त्यांचे धर्माचे तत्वज्ञान होते.

संत तुकाराम महाराजांना महादेव, नारायण आणि विठोबा ही तीन मुले आणि गंगा, भागीरथी, आणि काशी या तीन मुली होत्या. त्यांचा संसार अत्यंत सुखाचा होता. परंतु सर्वांचा संसार सुखाचा असावा, यासाठी त्यांची धडपड होती. त्यांनी पत्नीला आणि मुलांना अत्यंत प्रेमाने वागविले. संत तुकाराम महाराजांच्या कार्याचा त्यांच्या पत्नीला आणि मुलांना प्रचंड अभिमान वाटत असे. त्यांनी उत्पन्नाचा खूप मोठा भाग गोरगरिबांना मदत म्हणून वाटप केला. याचा त्यांना प्रचंड आनंद वाटत असे. त्यांच्या या लोककल्याणकारी कार्यात त्यांचा पत्नीचा मोठा वाटा आहे, त्यांना आपल्या पतीचा प्रचंड अभिमान वाटत असे. कष्टकरी, कामकरी, शेतकरी, महिला यांच्या अधोगतीचे कारण अज्ञानामध्ये आहे त्यामुळे आपण ज्ञानी झाले पाहिजे, हा संत तुकाराम महाराजांचा आग्रह होता. ज्ञान हीच महत्त्वाची संपत्ती आहे, असे त्यांचे मत होते. म्हणून ते म्हणतात.

आम्हा घरी धन।  
शब्दांचीच रत्ने।  
शब्दांचीच शस्त्रे ।यत्ने करू।  
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।  
शब्दे वाटू धन जनलोका।

संत तुकाराम महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रबोधन केले. त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची हिम्मत दिली. अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, विषमता याविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. त्यांनी अभंग लेखन केले. सनातनी व्यवस्थेविरुद्ध बंड केले. त्यावेळेस सनातन्यांनी संत तुकाराम महाराजांची बदनामी करायला सुरुवात केली. संत तुकाराम महाराजांकडे प्रतिभा नाही. त्यांना संस्कृत येत नाही, अशी अवहेलना सुरू केली. तेव्हा संत तुकाराम महाराज सनातन्याना उद्देशून म्हणाले.

वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा।  
येरानी वाहवा भार माथी।।  
तुका तरी सहज बोले वाणी।  
त्याच्या घरी वेदांत वाहे पाणी।।

संत तुकाराम महाराजांच्या या बोलण्यामागे दर्प नव्हता. अहंकार नव्हता. घमेंड नव्हती. उर्मटपणा नव्हता. होता तो नम्रतापूर्वक अभिमान! ज्ञान आणि गुणवत्ता ही कोणाची मक्तेदारी नाही. हे संत तुकाराम महाराजांनी ठासून सांगितले. संत तुकाराम महाराजांनी जनतेला धनसंपत्तीचे, श्रमाचे आणि काटकसरीचे महत्त्व पटवून दिले. आपण कष्ट केले पाहिजे, चांगल्या मार्गाने पैसा कमावला पाहिजे, त्याचा विनियोग विचारपूर्वक केला पाहिजे, असे सांगणारे संत तुकाराम महाराज हे महान अर्थतज्ज्ञ होते. ते म्हणतात.

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे।  
उदास विचारे वेच करी।।

सोन्याचांदीवर प्रेम करण्यापेक्षा आपल्याला जगवणाऱ्या मातीवर- भूमीवर प्रेम केले पाहिजे, असा आग्रह संत तुकाराम महाराज धरतात. आपल्याकडे कितीही सोने-चांदी असले तरी पोटाची भूक भागविण्यासाठी आपल्याला अन्नाची गरज असते आणि ते अन्न आपल्याला या मातीतून-जमिनीतून मिळते. माती ही सोन्याहून मौल्यवान आहे. त्यामुळे सोन्या चांदीचा हव्यास धरण्यापेक्षा मातीवर प्रेम करा, हा संत तुकाराम महाराजांचा विचार होता. ते म्हणतात

सोने-चांदी मृत्तिके समान।  
मृत्तिका सोन्याहून मौल्यवान।।

संत तुकाराम महाराजांनी दारू-तंबाखू प्राशन करणाऱ्यावर कडाडून हल्ला केला. व्यसनाधीनता हा मानवी विकासातील मोठा अडथळा आहे. व्यसनाधीनतेमुळे आपले शारीरिक, आर्थिक, सामाजिक नुकसान होते, हे संत तुकाराम महाराज अत्यंत कळकळीने सांगत असत. व्यसनाधीनतेमुळे घर बुडते, असे संत तुकाराम महाराजांचे मत होते. ते म्हणतात.

ओढुनि तंबाखू काढीला जे धूर।  
बुडेल ते घर तेणे पापे।

तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन केले तर घर बुडेल, असे संत तुकाराम महाराजांचे लोककल्याणकारी विचार होते.

गोरगरिबांना उपेक्षितांना मदत करणे हेच खरे पुण्य आहे आणि गोरगरीब उपेक्षितांना त्रास देणे हे खरे पाप आहे, अशी त्यांची पाप-पुण्याची संकल्पना होती. याबाबत तुकाराम महाराज म्हणतात

परोपकार ते पुण्य।  
परपीडा ते पाप।।

संत तुकाराम महाराज श्रमाला प्रतिष्ठा देतात. ऐतखाऊ, परजीवी लोक त्यांना आवडत नसत. दुसऱ्याच्या श्रमावर जगणाऱ्या लोकांचा त्यांनी नेहमी धिक्कार केला. भाकड कथा सांगून श्रमकऱ्यांच्या जीवावर जगणाऱ्या सनातनी बुवाबाजीला संत तुकाराम महाराज म्हणतात

भिक्षापात्र अवलंबणे।  
जळो जिने लाजिरवाणे।।

सनातन्यांनो, भिक्षा मागून जगता लाज कशी वाटत नाही? असा सवाल ते विचारतात. संत तुकाराम महाराजांनी भविष्य, पंचांग, मुहूर्त, शकुन-अपशकुन या अनिष्ट रूढी -परंपराविरुद्ध परखड शब्दात आवाज उठवला. त्यांनी बुद्धीप्रामाण्यवादाचा आग्रह धरला. ते म्हणतात.

मेळवुनि नरनारी।  
शकुन सांगति नानापरी।।  
तुका म्हणे ऐसे मैंद।  
तया पाशी नाही गोविंद।।  
सांगो जाणती शकुन।  
भूत भविष्य वर्तमान।।  
तयांचा आम्हांसी कंटाळा।  
त्याचे तोंड न पाहावे।।

भविष्य, पंचांग, मुहूर्त, पाहणाराचे थोबाड देखील पाहू नका, असे संत तुकाराम महाराजांचे मत आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात जिवंतपणी आई वडिलांना सांभाळा. मृत्यूनंतरचे कोणतेही जीवन नाही. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर पिंडदान करणे, तेरवी करणे, केस कापणे, नैवेद्य दाखविणे आणि तो नैवेद्य खाण्यासाठी कावळ्याची वाट पाहणे, हा मूर्खपणा आहे, असे संत तुकाराम महाराजांचे मत आहे. आपले मृत वाडवडील काय कावळे होते काय?

भुके नाही अन्न।  
मेल्यावरी पिंडदान।।  
हे तो चाळवाचाळवी।  
केले आपणची जेवी।।

तीर्थयात्रा करून पुण्याची अपेक्षा करण्यापेक्षा आई-वडिलांना सांभाळणे हेच खरे पुण्य आहे. काशी तीर्थक्षेत्राला गेल्यानंतर जेवढे पुण्य मिळते, त्यापेक्षा जास्त पुण्य आई-वडिलांची सेवा केल्यानंतर मिळते, असे संत तुकाराम महाराजांचे मत आहे.

मायबापे अवघी काशी।  
तेणे न भजावे तीर्थाशी।।  
तुका म्हणे मायबापे।  
अवघी देवाचीच रुपे।।

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन दगडधोंड्यांची पूजा करण्यापेक्षा कुटुंबातील आई-वडील, भाऊ-बहीण, मुलं, पत्नी यांचा आदर-सन्मान करा. गोरगरिबांना मदत करा. शेजाऱ्यांशी प्रेमाने वागा, हे संत तुकाराम महाराजांचे लोककल्याणकारी विचार आहेत **४ वर**

# शांती निकेतन पब्लिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन साजरा

**दैनिक युवक आधार**  
**नवीन पनवेल वार्ताहर**

शांतिनिकेतन पब्लिक स्कूल, नवीन पनवेल सेक्टर- २ येथे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांची कला कौशल्य सादर करून उपस्थितांची मन जिंकली.

३० आणि ३१ जानेवारी या दोन दिवशी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन नविन पनवेलमध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी न्यू जय भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा पूनम पवार, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल,




माजी नगरसेवक संतोष शेट्टी हे त्यांच्या पत्नीसमवेत उपस्थित होते. माजी नगरसेविका राजश्री वावेकर, स्मिता ढाकणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक खांदेश्वर पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस निरीक्षक बलवंत पाटील, यकूब अन्सारी उपस्थित होते. या मान्यवरांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. सीमाव पैकर यांनी केले. शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा हा शैक्षणिक उत्कृष्टतेचा आणि कठोर परिश्रमांचा भव्य उत्सव होता. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचे दर्शन करत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाला शेकडो पालक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला गुण व सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.




## वेब आणि मोबाइल अप्लिकेशन्ससाठी ७५ लाखांचा खर्च

# पथदिव्यासह स्मशानभूमी जीपीएस यंत्रणेला जोडणार



**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या वतीने स्मशानभूमी प्रणाली, उद्वाहन, सौरऊर्जेचे छतावरील पॅनल, महापालिकेंतर्गत बसविण्यात आलेले घरगुती पाण्याचे पंप, महानगरपालिका हद्दित उभारण्यात आलेले पथदिवे आणि हायमास्ट यांची अद्ययावत माहिती जीपीएस प्रणालीला जोडली जाणार आहे. यासाठी महापालिकेच्या यांत्रिक व विद्युत विभागाच्या वतीने ७५ लाख रुपये खर्च करून वेब आणि मोबाईल ॲप्लिकेशन्स बनवले जाणार आहे. ज्यामुळे आता रस्त्यावरील पथदिव्यांसह स्मशानभूमीची दुरुस्ती कधी केली आहे किंवा करायची आहे याची संपूर्ण माहिती या प्रणालीद्वारे मुंबईकरांना उपलब्ध होणार आहे.

### कामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी होणार मदत

या यांत्रिक व विद्युत विभागामार्फत स्मशानभूमी प्रणाली, लिफ्ट, सौरऊर्जेचे छतावरील पॅनल, महापालिकेंतर्गत बसविण्यात आलेले घरगुती पाण्याचे पंप, मुंबईत उभारण्यात आलेले पथदिवे आणि हायमास्ट यांची अद्ययावत माहिती कामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक आहे. तसेच पूर्ण झालेल्या कामाची सुलभतेने सेवा देण्यासाठी व देखभालीसाठी ही माहिती खूप आवश्यक आहे. त्यामुळे ही माहिती अद्ययावत करण्याकरिता प्रमुख कामांचे जीपीएसमध्ये मॅपिंग करण्यात येणार असल्याची माहिती यांत्रिक व विद्युत विभागाच्या वतीने यांत्रिक व विद्युत विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबई महापालिकेच्या यांत्रिक व विद्युत विभागाच्या वतीने महानगरपालिकेची रुग्णालये, महापालिका शाळा, उद्याने, खेळांची मैदाने, स्मशानभूमी या विविध खात्यांसाठी असलेली यांत्रिकी व विद्युत यंत्रणा तसेच साधनसामुग्री इत्यादींचे नियोजन करून त्यांची उभारणी, देखभाल आणि दुरुस्ती आदी कामे पाहिली जातात. यामध्ये विशेषतः उद्वाहने विद्युत शववाहिनी, लाकडी चितेकरिता हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, निरनिराळ्या वैद्यकीय संस्थामध्ये बसविलेली अद्ययावत वैद्यकीय उपकरणे, स्मशानभूमी व विद्युत/गॅस शवदाहिनी यांची दुरुस्ती आणि देखभालीची कामे या खात्यामार्फत पार पाडली जातात. तसेच ऊर्जा बचतीच्या संदर्भात महाराष्ट्र शासनातर्फे प्रसारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे ऊर्जा बचत, ऊर्जा देखभाल, सौर खात्यामार्फत हाती घेण्यात आली आहेत. ऊर्जेवर आधारित दिवे आणि पाणी तापविण्याची यंत्रणा बसवण्याची कामेही या खात्यामार्फत केली जातात.

# प्रवाशी हात दाखवुनही थांबत नाहीत बसेस..

## येरोळमोड येथे होतेय वयोवृध्द प्रवाशाची धावपळ..

**दैनिक युवक आधार**  
**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : उदगीर येरोळमोड मार्गे नळेगाव लातुर जाणाऱ्या उदगीर व लातुर डेपोच्या बसेस प्रवाशी थांब्याच्या नियोजीत जागेवर न थांबता शंभर सव्वाशे फुट आलीकडे किंवा पलीकडे उभा टाकत असल्याने वयोवृध्द पुरुष महिला प्रवाशांना बस पकडण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. याची प्रशासनाने दखल घेऊन येरोळमोड येथे नियोजीत ठिकाणी बसेस उभ्या कराव्यात अशी मागणी होत आहे.

शिरूरआनंतपाळ, चाकुर व उदगीर या तीन तालुक्याच्या सीमेवर असलेल्या येरोळमोड येथुन येरोळसह साकोळ, तळेगाव, पांढरवाडी, सुमठाणा, कबणसांगवी, अंबेवाडी, नागेशवाडी, उजळंब, व दैठणा येथील व्यापारी ,विद्यार्थी, जेष्ट नागरिक व शेतकरी विविध कामासाठी लातुर व उदगीर येथे जात येत असतात. शिवाय राज्य शासनाने जेष्ट नागरिक व महिला प्रवाशाना लालपरीतुन मोफत प्रवास सवलत दिल्याने येरोळमोड येथे प्रवाशाची गर्दी




होत आहे. परंतु प्रवाशी ज्या ठिकाणी थांबतात तेथे बस न थांबता शंभर फुट दुर उभा करत आहेत. जेष्ट नागरिक आजारी रुग्नांना बस पकडण्यासाठी पळत जावे लागत आहे. येरोळ, साकोळ, सुमठाणा, तळेगाव, कबणसांगवी येथील ग्रामपंचायत येथे ग्रा.प.चा ठराव घेऊन लातुर व उदगीर बसस्थानक प्रमुखांना लेखी देऊन नियोजीत स्थळी बसेस उभा करावेत व प्रवाशी निवारा उभा करावा अशी मागणी कबणसांगवीचे माजी सरपंच बस्वराज निला, येरोळ येथील जेष्ट नागरिक राम चौसष्टे, साकोळ येथील माजी सरपंच अब्दुल अजीज मुल्ला येरोळ येथील माजी सरपंच शिवाजी पालकर यांनी केले आहे.

# शिरूर अनंतपाळ येथे मन्मथस्वामी जन्मोत्सव साजरा...

**दैनिक युवक आधार**  
**प्रशांत तांबोळकर लातुर**  
**शिरूरआनंतपाळ :**

**विरशैव -** लिंगायत संप्रदायातील 16 व्या शतकातील संतश्रेष्ठ संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचा ४६४ वा जन्मोत्सव शिरूर अनंतपाळ शहरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे दयानंद वंलाडे,बंडू शेटे व धनराज सरकाळे यांच्या वतीने जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी शिक्षण विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व आरती करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या वेळी जेष्ठ नागरिक शंकरराव बेंबळगे, भिमाशंकर सलगरे,बी.बी.शिंदाळकर, गुरुनाथ अचवले,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, नियोजन सभापती संतोष शिवणे, सोमेश्वर तोंडारे, व्यंकट हांद्राळे,अमर देवंगरे,राजू शिवणे,शिवकांत संभाळे, गोपाळ हांद्राळे, आसिफ उजेड आदी ग्रामस्थ व भक्ती मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुंबई– गोवा राष्ट्रीय महामार्ग की अपघात मार्ग ??; राष्ट्रीय महामार्गावर अपघात मालिका चालूच ; ट्रेलर चालक ठार

**दैनिक युवक आधार**  
**नागोठणे वार्ताहर**

पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सुकेळी खिंडीत शनिवार 01 फेब्रुवारी दुपारच्या सुमारास चालकाचे आपल्या गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे ट्रेलरला झालेल्या अपघातात चालक जागीच ठार झाला. सदरील महामार्गावर सतत होत असलेल्या अपघातामुळे हा राष्ट्रीय महामार्ग आहे की अपघात मार्ग ?? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांसह प्रवाशी व चालकांना पडत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,शनिवार 01 फेब्रुवारी रोजी कोलाड बाजुकडुन पनवेल बाजूकडे अविनाश विठ्ठल माने वय 34 वर्षे रा. जावला – सोलापूर हा आपल्या ताब्यातील ट्रेलर क्रं MH 43 BX 9565 मधून कंटेनर चालवीत घेऊन जात असता दुपारी 2.30 वाजण्याच्या सुमारास सुकेळी खिंडीच्या उतारावरती खैरवाडी गावाजवळ आला असता ट्रेलर चालकाचे



आपल्या ताब्यातील गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे ट्रेलर सरळ जाऊन रस्त्याच्या मध्येच लावलेल्या रेलॉगला धडकुन पलटी झाला. या भीषण अपघातात ट्रेलर चालकाला लहान मोठ्या जखमा झाल्याने जागीच ठार झाला. अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात झाली असून पुढील तपास सहा.पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय.राजहंस नागदिवे करीत आहेत.

# सर्व शेतकरी बांधवांनी शेतकरी ओळखपत्र काढावे :- तहसिलदार विशाल नाईकवाडे

**दैनिक युवक आधार**  
**प्रतिनिधी विंचूर**

**राजेश भडांगे :-** प्रधानमंत्री किसान योजना, शेतकरी कर्ज वितरण सुलभता, पिक विमा योजना, पीक हमीभाव खरेदीसाठी मदत, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण, महा. डी.बी.टी वरील कृषी विभागाच्या सर्व योजना, केंद्र व राज्य शासनाच्या कृषी बाबतच्या सर्व योजनांसाठी अत्यावश्यक असणारे शेतकरी ओळखपत्र शेतकरी बांधवांनी तयार करून घ्यावे असे आवाहन निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे. या योजनेला कृषी - स्टॅक असे नाव असून शेतकरी व त्यांच्या शेतजमिनीची ओळख पटविणे, शेतकऱ्याने पेरलेल्या पिकाचे नाव आणि क्षेत्र निश्चित करून त्या माहितीच्या माध्यमातून शेतकरी कर्ज वितरण सुलभता व कृषी योजनांची कार्यक्षमतापूर्ण अंमलबजावणी करणे हा योजनेचा हेतू आहे. शेतकरी ओळखपत्र काढण्यासाठी शेतकऱ्याचे आधार कार्ड, आधार संलग्न मोबाईल क्रमांक, शेतकऱ्याचे सर्व सातबारा उतारे आवश्यक आहेत. ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सी.एस.सी सेंटर, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहायक व ग्रामविकास अधिकारी, आपले सरकार सेवा केंद्र व सर्व सेतू कार्यालय येथे शेतकरी ओळखपत्र काढण्याची सुविधा उपलब्ध आहे. ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत सातबारा आधारला लिंक केल्यावर शेतकरी ओळखपत्र मिळेल. ज्याद्वारे भविष्यातील सर्व योजनांचा लाभ घेता येईल. शेतकरी ओळखपत्र न काढल्यास शासकीय योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे महा ई सेवा केंद्रामध्ये जाऊन आपला सातबारा आधार लिंक करून शेतकरी ओळखपत्र बनवून घ्यावे.

**विशाल नाईकवाडे**  
**तहसिलदार, निफाड**

# चांभाली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक भाऊ मुंढे यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा

## विविध सामाजिक उपक्रमाने झाला वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**  
**रसायनी आनंद पवार**

चांभाली ग्रुप ग्रामपंचायत माजी सरपंच,कामगार नेते तथा अल्पावधीतच उद्योजक क्षेत्रात नावारूपाला आलेले चांभार्ली गावचे सुपुत्र अशोक भाऊ मुंढे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवत मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. अशोक भाऊ मुंढे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी११ वा.रसायनी-दापिवली येथील बी.पी.सी.एल. कंपनीच्या गेट समोर रसायनी पाताळगंगा माथाडी आणि जनरल कामगार संघटना युनियनच्या नामफलकाचे अनावरण सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोपानराव गोरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यानंतर खाने आंबिवली येथील राजाश्रय वृद्धाश्रमात अल्पोपहार चे वाटप करण्यात आले सायंकाळी रसायनी पाताळगंगा माथाडी आणि जनरल कामगार संघटना (युनियन) च्या चांभाली येथील नवीन कार्यालयाचे उद्घाटन रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या हस्ते करण्यात आले.अशोक भाऊ मुंढे यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जनता विद्यालयाच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आला होता वाढदिवसाचे औचित्य साधून रसायनी पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायातील ह.भ.प. कीर्तनकार महाराज तसेच चांभाली ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच विद्यमान सदस्य आणि परिसरातील पत्रकार बांधवांचा जाहीर सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून अशोकभाऊ मुंढे यांनी सामाजिक बांधिलकी जपत पंचक्रोशीतील समाज प्रबोधन करणारे वारकरी मंडळी,अन्याय विरुद्ध लेखणीच्या माध्यमातून आवाज उठवणारे पत्रकार बांधव तसेच लोकप्रतिनिधींचा सत्कार केल्याने साऱ्यांनीच अशोक भाऊ मुंढे यांचे कौतुक करत त्यांना पुढील आयुष्याच्या भरभरून शुभेच्छा दिल्यात त्यांच्या हातून यापुढेही असेच समाजकार्य घडत राहो असा आशावाद व्यक्त करत वारकरी मंडळींसह ज्येष्ठांनी अशोकभाऊंना आशीर्वाद दिला. जनता विद्यालयाच्या भव्य मैदानावर रात्री अजित मिस्त्री प्रस्तुत स्टार टाईम हिंदी मराठी गीतांचा बहारदार नजराणा यावेळी सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षक म्हणून प्रसिद्ध सिने अभिनेत्री बिग बॉस फिल्म माझ्या नवऱ्याची बायको या सिरीयल मध्ये भूमिका बजावणाऱ्या रुचिरा जाधव तर प्रसिद्ध अभिनेत्री व नृत्यांगना वंदना पांचाळ यांची उपस्थिती लक्षणीय ठरली. अशोकभाऊ मुंढे यांना शुभेच्छा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रितमशेठ म्हात्रे,पनवेल महानगरपालिकेच्या माजी महिला बालकल्याण सभापती निता माळी,माजी नगरसेविका राजश्री वावेकर(पनवेल) प्रसिद्ध उद्योजक तुकारामशेठ दुधे,मा. सरपंच संदीपशेठ मुंढे, कृष्णाशेठ पारंगे,माजी सभापती रमेश पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाशशेठ गायकवाड,तारामती ब्रिगेडच्या शिवमती वंदना मोरे,शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुख वैजयंती ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गटाच्या) रायगड जिल्हा महिला अध्यक्षा दीपिका भंडारकर,समता परिषदेच्या श्रीमती. संतोषी मोरे,ग्राम सुधार मंडळाचे कार्याध्यक्ष सुदामशेठ मुंढे,सचिव तात्यासाहेब म्हसकर, जनता विद्यालय इंग्रजी माध्यमाचे प्राचार्य वारे सर,ज्येष्ठ नेते प्रमोद राईलकर,सुभाष आहिर,यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक,शैक्षणिक, क्रीडा,वैद्यकीय क्षेत्रातील मंडळीं बरोबरच परिवारातील सदस्य व त्यांच्या चाहत्यांनी उपस्थित राहून अशोकभाऊ मुंढे यांना शुभेच्छा दिल्यात.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# अतिक्रमण हटवा अन्यथा आत्मदहन आंदोलन

## कार्यकारी अभियंत्यास काँग्रेसचा ईशारा

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधीः**
**- लखन वाल्हेकर**

नेवासा फाट्यावरील अहिल्यानगर- संभाजीनगर महार्गावरील दोन्ही बाजूकडील झालेले अतिक्रमण तातडीने हटवा अन्यथा शंभर कार्यकर्त्यांसह राजमुद्रा चौकात आत्मदहन करण्याचा ईशारा काँग्रेस पक्षाने जागतिक बँकेच्या कार्यकारी अभियंता यांना दिला. नेवासा फाटा येथे अहिल्यानगर -संभाजीनगर महामार्गवर झालेल्या अतिक्रमणमुळे सततची होत असलेली वाहतुक कोंडी, सततचे होणारे अपघात व निष्पाप लोकांचा जाणारा बळी,याचा महामार्गवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या सर्वांना नेवासा फाटा या ठिकाणी दोन्ही बाजूने झालेले अतिक्रमण जबाबदार असल्याचे

> अतिक्रमणमुळे कोंडलेला श्वास मोकळा करून अपघातात मृत झालेल्या कुटुंबास न्याय मिळवून देणार. यापुढे एकही अपघात नेवासा फाटा परिसरात होणार नाही यासाठी प्रयत्न करणार - अंजुम पटेल, शहराध्यक्ष नेवासा काँग्रेस

स्पष्ट दिसून येते. नेवासा फाटा या ठिकाणी महामार्गवर मनमानी करून अनेक व्यवसायिकानी हातगाड्या, टपऱ्या, चहाचे दुकान, चौक उभारणी, साईड पट्ट्यावर फ्लेक्स उभारणी, दुकानाचे शेड रस्त्यापर्यंत उभारले यामुळे रस्त्याचा श्वास कोंडला असून फोर वे रस्ता हा सिंगल रस्त्याच्या स्वरूपात रूपांतरीत झाला आहे. याच कारणाने अपघात वाढण्याच्या घटना खूप मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. काँग्रेस पक्षाने या सर्वांची दखल घेत जागतिक बँकेचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेत अतिक्रमण काढण्याचे निवेदन दिले होते. सदर विभागाकडून अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढण्याचे आदेश नोटीशी द्वारे देण्यात आले होते. परंतु या नोटिशीचा कोणताही परिणाम अतिक्रमण धारकांवर झाला नाही.एकाही अतिक्रमण धारकांने अतिक्रमण काढले नाही.यामुळे काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यानी आज अहिल्यानगर येथे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन कठोर भूमिका घेत तातडीने अतिक्रमण काढण्यात यावे अशी भूमिका मांडली.अन्यथा शंभर कार्यकर्त्यांसह नेवासा फाटा येथील राजमुद्रा चौकात आत्मदहन आंदोलन करण्यात येईल असा ईशारा निवेदणाद्वारे देण्यात आला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल, बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण, सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब काळे, बहुजन मुक्तीचे गणपत मोरे, आदिसह नागरिक उपस्थित होते.

# नेवासा शहरात नियमित स्वच्छ पाण्याचा पुरवठा करा

## नगरपंचायतला टाळे ठोकण्याचा शहर काँग्रेसचा ईशारा

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधीः**
**- लखन वाल्हेकर**

नेवासा शहरास स्वच्छ पाण्याचा पुरवठा योग्य वेळेवर करा अन्यथा नेवासा नगरपंचायतला टाळे ठोकण्याचा ईशारा नेवासा शहर काँग्रेसने मुख्याधिकारी यांना दिला. नेवासा ग्रामपंचायतची नगरपंचायत होऊन दहा वर्ष पूर्ण होत आली परंतु शहरातील समस्या संपता संपेना. जनतेचे होणारे हाल आजही तेच आहे जे पूर्वी होते.शहरातील मुख्य पायाभूत सुविधा तर सोडाच शहरातील स्वच्छता, पाणी पुरवठा या समस्या आजही तशाच आहेत. शहराला पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या योजनेस चाळीस वर्ष उलटून गेले. लोकसंख्याचा विचार केला असता या योजनातुन होणारा पाणीपुरवठा अत्यल्प आहे. तर या योजनेची मुदत देखील संपलेली आहे,पाणी फिल्टर होण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. आजही नगर पंचायतला पाणी पुरवठा देखरेखीसाठी अभियंता नाही. नेवासा उपनगरास व शहरास आठ ते दहा दिवसातून एकदा पाणी पुरवठा केला जातो तेही अत्यल्प, शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणी मिळणे मुश्किल झाले आहे. या समस्याची नेवासा शहर काँग्रेसने दखल घेत आज नगरपंचायत मुख्याधिकारी यांची भेट घेतली व शहरातील पाणी पुरवठा समस्यावर चर्चा केली. शहराला नियमित स्वच्छ पाणी पुरवठा करण्याची मागणी केली तसेच वेळीच जर स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला नाही तर नगर पंचायतला टाळे ठोकण्याचा ईशारा नेवासा शहर काँग्रेस कडून देण्यात आला.यावेळी नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी शहरात स्वच्छता, मोकाट जनावरे, पाणी पुरवठा, अशा अनेक समस्या आहेत त्या सोडविण्याऐवजी त्यावर राजकारण जास्त करण्यात येते. नागरिकांना पाणी व घरपट्टी या मोठया फुगवून दिलेल्या आहेत या भरण्यात नागरिक हैराण झालेले आहेत. त्या प्रमाणात नागरिकांना सुविधा मिळत नाही.तर बसपाचे हरीश चक्रनारायण यांनी याविरोधात तीव्र भूमिका घेत जर समस्या सुटल्या नाही तर नगरपंचायतचे कामकाज चालू देणार नाही असा इशारा दिला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, इम्रान पटेल,उपाध्यक्ष कैलास बोर्डे, बहुजन मुक्ती मोर्चाचे गणपत मोरे आदी उपस्थित होते.

# क्रीडा सह्याद्री चा खेळाडू दक्ष विनोद गायकवाड याची टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड.

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय**
**प्रमुख :राजू शिंदे**

**नाशिक** : टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित १४ वर्षे आतील राज्य अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथे उत्साहात संपन्न झाली.

त्यामध्ये निफाड येथील क्रीडा सह्याद्रीचा खेळाडू दक्ष विनोद गायकवाड याची महाराष्ट्र संघात व राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचे निफाड तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

राज्य स्तरीय १४ वर्षे आतील स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ मीनाक्षी गिरी , वूमन डायरेक्टर धनश्री गिरी ,महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे इत्यादी उपस्थित होते. क्रीडा सह्याद्री चा खेळाडू दक्ष विनोद गायकवाड याची नाशिक संघात निवड झालेली होती त्याने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळ करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची ऑलराऊंडर म्हणून महाराष्ट्र संघात निवड झालेली आहे, राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा मथुरा येथे होत आहे ,दक्ष गायकवाड त्याची महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल





भारतीय टेनिस महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी , उपाध्यक्ष विलास गिरी, वुमन डायरेक्ट धनश्री गिरी ,सहसचिव धनंजय लोखंडे व नाशिक जिल्हा विलास गायकवाड माहिती अधिकार पत्रकार संघाचे सचिव विनोद गायकवाड ,राहुल कुलकर्णी ,,क्रीडा सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड क्रीडा सह्याद्री सदस्य ,रमेश वडघुले,प्रतीक्षा कोतकर ,कीर्ती कोटकर,निलम बेंडकुळे ,विजय घोटेकर ,लखन घडमाळे , यांनी सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या दक्ष ला विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# कलागुण मन व बुद्धीला सकस बनवते :- बाळासाहेब क्षीरसागर

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना नम्र, शिस्तप्रिय, चपळ व ध्येयवादी बनवणारी व प्रेरित करणारी गोष्ट म्हणजे विविध कला गुण होय. खेळ व्यक्तीला मानसिक व शारीरिक दृष्ट्या प्रबळ बनवतो आणि विविध सांस्कृतिक उपक्रमातून सकस व्यक्तिमत्व घडत जाते, एकूणच वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विविध स्पर्धा व उपक्रमातून विद्यार्थ्यांचे मन व बुद्धी सकस होण्यास मदत मिळते असे प्रतिपादन सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले. मविप्र समाजाचे क.ग.दा. मोरे निफाड महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन सप्तरंग उत्सव अंतर्गत विविध स्पर्धा आयोजनाचे उद्घाटन नुकतेच पार पडले... यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उद्घाटक निफाड पोलिस स्टेशनचे



पोलीस निरीक्षक गणेश गुरव, प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. अभय वडघुले, सर्व विभागांचे प्रमुख व सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटक पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी या वेळी विद्यार्थ्यांना शिस्त पाळावी, मोबाईलचा योग्य उपयोग करावा आणि स्वतः मधील गुणवत्ता विकसित करावी याविषयी मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून आणि आकाशात फुगे सोडून कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले. प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी सप्तरंग स्नेहसंमेलन उपक्रमांची माहिती देताना अनुक्रमे दि. 1 ते 07 फेब्रुवारी या दरम्यान मैदानी क्रीडा स्पर्धा, मेहेंदी - रांगोळी - पुष्परचना, निबंध,काव्य,वक्तृत्व, वादविवाद, पारंपरिक वेशभूषा,पाककला,आनंद मेळा, साडी डे,टाय कोट डे,सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण, शेले पागोटे वाचन, आणि गुणगौरव - बक्षीस वितरण सोहळा या सर्व आयोजित कार्यक्रमाची रूपरेषा विशद करून सर्व विद्यार्थ्यांनी यात सहभाग होऊन यातून निखळ आनंद घ्यावा तसेच महाविद्यालयीन शिस्तीचे सर्वांनी काटेकोर पालन करावे असे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. सप्तरंग वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उद्घाटन समारंभ... प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उद्घाटक पोलीस निरीक्षक गणेशजी गुरव, प्राचार्य डॉ. सुरेश जाधव व मान्यवर.

# स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः-योगेश पालोदकर**

सिल्लोडः-माणिकराव पालोदकर इंग्लिश स्कूल, अजिंठा आणि महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालय ,अजिंठा यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या वार्षिक स्नेहसंमेलनात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य श्री .अशोकराव पंडित सर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अजिंठा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. अमोल ढाकणे साहेब, अजिंठा ग्रामपंचायत चे सरपंच नजीर गाईड, उपसरपंच माधुरी देशमुख, भारतीय स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक इमरान खान , प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सचिन पालोदकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य व मुख्याध्यापक श्री. शिवाजीराव भोंमबे, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती. प्रिया राजपूत यांनी मानले



# पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांची सोलापूर नियंत्रण कक्षात तडकाफडकी बदली,

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**



तर पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी मंगळवेढा पोलीस ठाण्याचा स्वीकारला पदभार...! पो.नि. महेश ढवाण यांना पोलिसांचे लाच प्रकरण भावले, पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांची पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी शनिवारी दुपारी सोलापूर कंट्रोल तथा दहशतवादी विरोधी शाखेकडे तडकाफडकी बदली करण्यात आली आहे, तर त्यांच्या जागी सोलापूर दहशतवाद विरोधी शाखा येथून पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे रुजू झाले असून त्यांनीही तात्काळ शनिवारी सायंकाळी मंगळवेढा पोलीस ठाणेचा पदभार स्वीकारला आहे, दरम्यान आपण लोकाभिमुख प्रशासक करण्यास अधिक प्रधान्य देणार असल्याचे प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले आहे, मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांनी मागील सहा महिन्यांपूर्वी पदभार घेतला होता, दरम्यान (दि. 25) जानेवारी रोजी बोराळे बीट हद्दीत दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे लाच प्रकरण पोलीस निरीक्षक ढवाण यांना भोवल्याची चर्चा आहे, त्यामुळेच त्यांच्यावर बदलीची कुऱ्हाड कोसळली आहे, शनिवारी दुपारी पोलीस अधीक्षक कार्यालयकडुंन ढवाण यांच्या बदलीचा आदेश जारी करण्यात आला, त्यांची नेमणूक आता सोलापूर ग्रामीण कंट्रोल तथा दहशतवाद विरोधी शाखेकडे झाली आहे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे सन 2005 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा स्पर्धा आयोगाकडून घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होवून पोलीस खात्यात दाखल झाले आहेत, ते मूळचे सांगली जिल्ह्यातील आहेत त्यांनी आत्तापर्यंत मुंबई,वर्धा,धाराशिव कोल्हापूर येथे आपली सेवा बजावली आहे,

# विद्या प्रतिष्ठान अनंतराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

बारामती तालुक्यातील मुलांमधील प्रतिभेचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने,त्यांची काव्य प्रतिभा विकसित होण्याच्या दृष्टीने तसेच त्यांच्यात मराठी भाषेविषयी प्रेम निर्माण करण्याच्या हेतूने अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था,पुणे यांच्यातर्फे 'मराठी बालकुमार काव्य स्पर्धा 'आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये विद्या प्रतिष्ठान अनंतराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित



केलेले आहे.पाचवी ते सातवी या गटातून प्रथम क्रमांक कु.रितिका चंदुलाल धुमाळ तर द्वितीय क्रमांक कु.आदित्य संतोष गोसावी यांनी पटकावला.आठवी ते दहावी या गटातून प्रथम क्रमांक कु.श्रुती हेमंत जाधव हिने पटकावला. कु.श्रेया नवनाथ सूर्यवंशी हिस उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला. या स्पर्धेसाठी मराठी विषयाच्या शिक्षिका सौ.मेघाली चौधरी व सौ.मोहिनी गावडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सरिता शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# विजय चोरगे समाज सेवक यांच्या घरी माघी श्रीगणेशा आणि विनायक चतुर्थी निमित्त दिड दिवस बसविण्यात आले आहे

**दै युवक आधार**
**कल्याण/रशीद शेख कल्याण**



ग्रामीणीक भागातील प्रत्येक गावा गावा मध्ये घरा घरात आपल्याला गणपती बाप्पाची मुर्ती बघायला मिळते माजी सरपंच तुकाराम चोरगे जागृती मनिषा संकेत चोरगे, आकाश, गणेश, काजल, या सर्व महिला पुरुष दोनशेहून जास्त लोकांनी महा प्रसादाचा लाभ घेतला आहे विजय चोरगे समाज सेवक त्यांच्या धर्मपत्नी मनिषा चोरगे माघी श्रीगणेशा जयंती निमित्ताने गणेशाला नतमस्तक होतांना दिसत आहेत.

# शिवजन्मोत्सव पूर्वतयारी स्वच्छता मोहीम क्रमांक ३ यशस्वीरीत्या संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवछत्रपती यांची १९ फेब्रुवारी ला दरवर्षी किल्ले द्रोणागिरीवर शिवजयंती साजरी करण्यात येते. या शिवजयंतीसाठी पूर्वतयारी म्हणून मागील महिन्यापासून स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या आत्तापर्यंत तीन स्वच्छता मोहीम पूर्ण करण्यात आल्या. त्यातीलच आजची तिसरी स्वच्छता मोहीम संपन्न झाली. या स्वच्छता मोहिमेमध्ये शिवजन्मोस्तवाच्या वेळी गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी स्वच्छ रस्ता करण्यात आला, त्याचबरोबर गडावर अनावश्यक असणारी झाडी, झुडपे तोडण्यात आली, गडाच्या पायथ्यालगत असणारे हनुमान मंदिर त्या ठिकाणी खजलेल्या रस्त्याचे काम करण्यात आले, त्याचबरोबर अनावश्यक झाडे झुडपे तोडण्यात आली, गडावर जाऊन जेवण बनवण्यासाठी लाकडे गोळा करण्यात आली. अशा विविध प्रकारची कामे किल्ले द्रोणागिरीवर करण्यात आली. शिवजन्मोत्सवाच्या या स्वच्छता मोहिमेमध्ये लहान थोरांपासून सर्वजण सहभागी होत असतात. आणि हे आपले मावळे डोंगरदऱ्यातून रस्ता काढत या मोहिमेची सुरुवात करीत असतात. रविवार २ फेब्रुवारी २०२५ या दिवशी सदर स्वच्छता मोहीम घेण्यात आली. या शिवकार्यात प्रत्येक शिवभक्त उत्साहाने आपले योगदान देत असते. याही वेळी लहान थोरांपासून मोठ्यांपर्यंत सदर शिवकार्यात भाग घेण्यात आला होता. शिवजन्मोत्सवाच्या या स्वच्छता मोहिमेचे नियोजन दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण मंडळाचे अध्यक्ष राज मात्रे आणि मंडळाचे सर्व शिलेदार हिरीरीने या शिवकार्यात भाग घेत असतात. त्याचबरोबर इतर शिवभक्त ही या स्वच्छता मोहिमेमध्ये भाग घेऊन आपल्या शिवछत्रपती शिवरायांप्रति असलेला आदर आणि आपण स्वराज्याच्या भूमीचे काही ऋण फेडत आहोत अशा प्रत्येक शिलेदार आपल्या मनातील भावना व्यक्त करत असतात. एकंदरीत सदर रविवारी घेण्यात आलेली शिवजन्मोत्सवापूर्वीची स्वच्छता मोहीम -3 यशस्वीरीत्या शिवछत्रपतींच्या नामघोषात पार पाडण्यात आली.





# राज्यस्तरीय जम्परोप स्पर्धेचे शानदार उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नवी मुंबई उलवे येथे प्रथमच जम्परोप खेळाचे आयोजन करण्यात आले आहे जिल्ह्यामध्ये प्रथमच अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन होत असल्याने जिल्ह्याभरातील क्रीडा क्षेत्रात कुतूहलाचे वातावरण आहे जम्प रोप हे क्रीडा प्रकारात असल्याचे प्रथमच अनेकांना समजले आहे रायगड जिल्ह्यातून जवळपास 60 खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रात नाशिक ठाणे मुंबई उपनगर पालघर मुंबई पुणे सोलापूर छत्रपती संभाजी नगर नांदेड जालना बीड यवतमाळ कोल्हापूर वाशिम लातूर या जिल्ह्यातील अनेक खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत स्पर्धा दोन दिवस सुरू राहणार असून सेक्टर 25 येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात या




स्पर्धेचे आयोजन केले गेले आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी उरण विधानसभा आमदार श्री महेश बालदीजी यांनी रायगड जंपरोप संघटनेला बहुमूल्य असे सहकार्य केले. त्याचबरोबर माननीय खासदार साहेब लोकनेते माननीय श्री रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकुर जी यांनी देखील स्पर्धा आयोजनात सिंहाचा वाटा उचलला. या प्रोत्साहनाने खेळाडू व त्यांचे मार्गदर्शकांनी साहेबांचे आभार मानले तसेच उद्घाटनाप्रसंगी राज्य संघटनेचे सरचिटणीस श्री दीपक जी निकम यांनी या खेळाविषयी व खेळाडूंविषयी माहिती दिली त्याचप्रमाणे स्पर्धा आयोजनासाठी अथक प्रयत्न करणारे श्री निलेश जी खारघर व सौ. निकिता खारकर मॅडम तसेच श्री अजय काकडे सौ सुवर्णा काकडे यांचे कौतुक करत पुढील स्पर्धांसाठी त्यांच्या असेच पाठीशी उभे राहू अशी इच्छा मान्यवरांनी व्यक्त केली आमदार श्री. महेश बालदी साहेब यांचे स्विय सहाय्यक मा श्री प्रवीण काळकुटे यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना या खेळाला इथून पुढे देखील सहकार्य करत राहू, असे आश्वासन दिले. तसेच वैष्णवी लॉजिस्टिक्स संचालक श्री कोमापल्ली यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र थ्रो बॉल चे सचिव श्री राहुलजी वाघमारे यांनी या खेळाचे व खेळाडूंचे भविष्य उज्वल होईल असे सांगत रायगड जिल्ह्यात तसेच मुंबई विभागात खेळाविषयी मदत करण्याचे आश्वासन दिले. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी आमदार महेश जी बालदी यांचे स्वीय सहाय्यक मान्य श्री प्रवीण काळपाटे, महाराष्ट्र जंप रोप चे सचिव दीपक निकम, खजिनदार प्रशांत परगावकर, नीलेश खारकर, निकिता खारकर, व्यंकटराम कोमपल्ली, प्रिन्सिपल शाईना शेख, राहुल वाघमारे, प्रिया शिंदे, स्मिता ठाकूर, मंजुळा कोळी, आदी मान्यवर उपस्थित होते त्याचबरोबर श्री राजू माने (सोलापूर), संजय सातारकर (यवतमाळ), वर्षा काळे (मुंबई उपनगर), पराजि कुसळे (बीड), लता पाचपोर (ठाणे), आदी मान्यवर ही उपस्थित होते स्पर्धांचे आयोजन रायगड जिल्हा जम्प रोप असोसिएशनचे अध्यक्ष श्री अजय काकडे व सुवर्णा काकडे यांनी केले तसेच स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री ज्ञानेश्वर मिरकुटे मिलिंद ठाकूर, प्रदीप राठोड, मनीषा मिरकुटे, संदीप पाटील, क्षितिजा राठोड, रोशनी डिमलो व रीचल पाटील आदी प्रयत्नशील आहेत

# खारघरच्या कर्करुग्णालयात सुविधांचा विस्तार, समग्र उपचारांवर भर देण्याचा 'टाटा हॉस्पीटलचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**




गेल्या काही वर्षांमध्ये कॅन्सर रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन टाटा कॅन्सर रुग्णालयाच्या खारघर येथील कॅन्सर रुग्णालयामध्ये बहुउदेशीय वैद्यकीय सुविधांचा विस्तार करण्यात येणार आहे. तिथे आणखी ४५ हजार कॅन्सरग्रस्तांना वैद्यकीय उपचार मिळतील, असा विश्वास रुणालय प्रशासनाने व्यक्त केला आहे. कॅन्सरवर वैद्यकीय उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड तसेच इतर अवयवांवर काही परिणाम झाल्यास त्यांना इतरत्र पाठवण्यात येते. येथील नव्या बारा मजली बहुउद्देशीय इमारतीमध्ये समग्र उपचार देण्यात येणार आहेत. दीडशे खाटांची ही सुविधा पुढील तीन वर्षांमध्ये उपलब्ध होणार आहे. खारघर येथील कॅन्सर रुग्णालयाचे संचालक डॉ. पंकज चतुर्वेदी यांनी यासंदर्भात माहिती दिली. 'कॅन्सरमुळे विविध इतर आजारांचाही त्रास होतो. केमोथेरपीसारख्या उपचार पद्धतीमुळे इतर गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतात. हे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्नांची गरज असते', याकडे डॉ चतुर्वेदी यांनी लक्ष वेधले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेक रुग्ण उपचारांसाठी येतात. 'इन्फोसिस फाऊंडेशन'च्या सहकार्याने 'आशा निवास' सुविधेतंर्गत मोफत वा अत्यल्प दरामध्ये तीनशे रुग्णांसह त्यांच्या काळजी घेणाऱ्या कुटुंबीयांसाठी निवास सोय उपलब्ध करण्यात आली आहे. या वर्षात २२० बालरुग्णांसाठी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. 'सात राज्यांतील रुग्णालयांमध्ये १ लाख २० हजार नव्या कॅन्सरग्रस्तांना उपचार दिले जातात. रुग्णालयांचा विस्तार करताना नव्या एक हजार खाटा उपलब्ध होणार आहेत', असे टाटा कॅन्सर रुग्णालयाचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांनी सांगितले. खारघर येथील कॅन्सर रुग्णालयाकडून संशोधनाला चालना देण्यात येणार आहे. सीएसआर निधीतून भारतातील सर्वांत मोठ्या रेडिएशन केंद्राची सुरुवात होईल.

## संपादकीय

**पान २ वरुन**. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन फलप्राप्ती होणार नाही, असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

जाऊनिया तीर्था काय तुवा केले।
चर्म प्रक्षाळीले वरी वरी।।
तीर्थी धोंडा पाणी।
देव रोकडा सज्जनी।।
नाही निर्मळ जीवन।
काय करील साबण।।

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन तुम्ही अंग स्वच्छ कराल, पण अंतकरण स्वच्छ करणारे साबण आहे का? पाणी स्वच्छ नसेल तर महागडे साबण देखील उपयुक्त ठरणार नाही. अंतकरण स्वच्छ करणारे साबण अजून आलेले नाही. सज्जन लोक हे तीर्थक्षेत्रापेक्षा आणि साबणापेक्षा श्रेष्ठ असतात, असे संत तुकाराम महाराज यांचे विचार आहेत.

कुंभमेळा हा भटांचा पर्वणी मेळा असतो, असे संत तुकाराम महाराजांचे परखड मत होते. कुंभमेळ्याला जाऊन आंघोळ करणं, केस कापणे, यात कसला आलाय धर्म? हा तर मूर्खांचा बाजार आहे. असे क्रांतिकारक आणि परखड मत तुकाराम महाराजांनी एका अभंगात द्वारे व्यक्त केले आहे

आली सिंहस्थ पर्वणी।
न्हाव्या भटा झाली धनी।।
अंतरी पापाची कोडी।
वरी वरी बोडी दाढी।।
बोडीले ते निघाले ।
नाही पालटले अवगुण।।
पाप गेल्याची काय खूण।
तुका म्हणे अवघा सीन।।

अशा क्रांतिकारक संत तुकाराम महाराजांचा शेवट कसा झाला, याबद्दल मतभिन्नता आहे. ती मतभिन्नता आपण पाहू.

संत तुकाराम महाराज यांचा जन्म 1608 चा तर मृत्यू 1650 सालचा, म्हणजे ते फक्त 42 वर्षे जगले. ते वयाच्या 42 व्या वर्षी मृत्यू पावले. हे वय मृत्यूचे नाही. संत तुकाराम महाराज अत्यंत तरुण असताना त्यांचा मृत्यू कसा झाला हा नेहमीच शंकेचा,वादाचा विषय राहिला आहे. संत तुकाराम महाराजांचा मृत्यू कसा झाला हे समजून घेण्यासाठी त्यांचा संघर्ष समजून घ्यावा लागेल. ते अत्यंत बुद्धिमान,प्रेमळ आणि श्रीमंत होते. त्यांनी सुमारे 5 हजार अभंग लिहिले. त्यांनी लोकांना कर्जमुक्त केले. संत तुकाराम महाराजांचा लढा विषमतेविरुद्ध होता.ते म्हणतात

भेदाभेद भ्रम अमंगल।
सर्वांची एकची वीण।
तेथे कैसे भिन्नाभिन्न।

भेदभाव बाळगणे अमंगल आहे, तर समता बाळगणे मंगलमय आहे. सर्व माणसं समान आहेत. असे सांगून संत तुकाराम महाराजानी विषमतेला विरोध करून समतेचा आग्रह धरला. वर्णव्यवस्थेवर हल्ला करताना संत तुकाराम महाराज म्हणतात.

वर्णाभिमाणे।
कोण झाले पावन।।
ऐसें द्या सांगून।
मजलागी।।

संत तुकाराम महाराजानी वर्णव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. त्यामुळे जे वर्णव्यवस्थेचे समर्थक होते, ते तुकाराम महाराजावर प्रचंड चिडले. कारण वर्णव्यवस्था हे ऐतखाऊ लोकांचे दुसऱ्याच्या श्रमावर जगण्याचे भांडवल होते.

संत तुकाराम महाराजानी अंधश्रद्धेवर कडाडून हल्ला केला.

नवसे कन्यापुत्र होती।
मग का करणे लागे पती।

नवस सायास करू नका,प्रयत्नानेच यश मिळेल.

असाध्य ते साध्य।
करिता सायास।
कारण अभ्यास।
तुका म्हणे।

प्रयत्नवादी व्हा, दैवावर विश्वास ठेवू नका, प्रयत्न केल्याने अशक्य काम शक्य होते, हा संदेश संत तुकाराम महाराजानी दिला. सनातन्यांचा व आपला धर्म एक नाही, त्यामुळे त्यांचा संबंध तोडा, त्यांच्याकडून कोणतेही विधी करू नका,असा मोलाचा उपदेश संत तुकाराम महाराजानी केला.

अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड।
काय त्यासी रांड प्रसवली।।
तुका म्हणे ऐसें लंड।
त्याचे हाणोनि फोडा तोंड।।

सनातन्यांच्या वर्चस्वातून समाज मुक्त व्हावा, या हेतूने संत तुकारामांनी ब्राह्मणी व्यवस्थेवर कडाडून हल्ला केला.

ऐसें कैसे झाले भोंदू।
कर्म करुनि म्हणती साधू।।
अंगा लावुनिया राख।
डोळे झाकुनि करिती पाप।।
दावी वैराग्याची कळा।
भोगी विषयांचा सोहळा।।
तुका म्हणे सांगो किती।
जळो तयांची संगती।।

भटाची संगत सोडा हे संत तुकाराम महाराजानी निक्षून सांगितले. त्यांनी यज्ञ, होम, हवन, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, दशक्रिया, पुरोहितगिरी, पंचांग, भविष्य याविरुद्ध मोहीमच उघडली, त्यामुळे सनातनी वर्ग संत तुकाराम महाराजांच्या विरोधात उभा राहिला. त्यांच्या अभंगांची गाथा सनातन्यांनी इंद्रायणीत बुडवली. ते पदोपदी संत तुकाराम महाराजाना त्रास देऊ लागले आणि यातच संत तुकाराम महाराज नाहीसे झाले.

ब्राह्मणी पक्षाच्या मतानुसार ते वैकुंठाला गेले, तर अभ्यासक सुदाम सावरकर आणि संस्कृतपंडित डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या मतानुसार त्यांचा घातपात झालेला आहे. दोन्ही पक्षाचे मत पाहण्यापूर्वी संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठ, स्वर्ग याबाबत काय मत होते,ते आपण पाहू. संत तुकाराम महाराज हे जीवनाला कंटाळलेले नव्हते. ते जगू आणि लढू इच्छिणारे हिम्मतवान आणि क्रान्तीकारक संत होते. ते म्हणतात

बुडता हे जन न देखवे डोळा।
येतो कळवळा म्हणोनिया।

जनतेला ब्राह्मणी गुलामगिरीतून बाहेर काढणे हे त्यांचे जीवितकार्य होते. त्यामुळे ते जबाबदारी सोडून इहलोक सोडून जाणारे नव्हते. ते उपास-तापास जप-जाप्य करणारे नव्हते.

नको सेवू वन।
नको सांडू अन्न।

अन्नत्याग करणे आणि वनांत जाणे, याला संत तुकाराम महाराजानी विरोध केला.
संत तुकाराम महाराजानी स्वतः स्वर्ग, वैकुंठ, मोक्ष नाकारलेला आहे. ते म्हणतात

येथे मिळतो दहिभात।
वैकुंठी त्याची नाही मात।

पृथ्वीवर काबाडकष्ट केले तर दहीभात-भाजीभाकरी तर मिळेल, पण वैकुंठात जे कामधेनू, कल्पवृक्ष, चिंतामणी सांगितले जातात ते धादांत खोटं आहे.ते म्हणतात

भय नाही जन्म घेता।
मोक्षपदा हाणो लाथा।
तुका म्हणे आता।
मज न लगे सायुज्यता।

संत तुकाराम महाराज म्हणतात "या जन्माची मला भीती नाही, म्हणजे ते पृथ्वीवर राहू इच्छित होते, मोक्षाला लाथा घाला" असे म्हणून ते मोक्ष(वैकुंठ) नाकारतात. जे तुकाराम महाराज वैकुंठ नाकारतात, ते तुकाराम महाराज वैकुंठाला जातील का?. तथाकथित मोक्षाचे अतिउच्च पद म्हणजे सायुज्यपद आहे, असे वैदिक परंपरा सांगते, त्या सायुज्यपदाला तुकाराम महाराज नाकारतात. म्हणजे जे तुकाराम महाराज वैकुंठ नाकारतात, ते तुकाराम महाराज वैकुंठाला जातील का?. तुकाराम महाराज म्हणजे

बोले तैसा चाले।
याची वंदावी पाऊले।

या विचारांचे जसे बोलायचे तसे वागायचे, असे होते. म्हणजे तुकाराम महाराज वैकुंठाला गेले नाहीत, हे त्यांच्याच अभंगावरून/विचारावरून स्पष्ट होते. मग तुकाराम महाराजांचा वयाच्या 42 व्या इतक्या तरुण वयात मृत्यू कसा झाला?

संत तुकाराम महाराजांचा लढा सनातनी व्यवस्थेविरुद्ध होता. त्यांनी तुकाराम महाराजाना खूप त्रास दिला होता. तुकाराम महाराज विचाराने लढत होते, तर, सनातनी त्यांच्याविरुद्ध कटकारस्थान करत होते. त्यांच्या अभंग लेखनावर बंदी घालणे, त्यांचे अभंग इंद्रायणीत बुडवणे, त्यांची बदनामी करणे, या बाबी सनातन्यांनी संत तुकाराम महाराजांची घातपात करून ते विमानात बसून वैकुंठाला गेले, अशी अफवा पसरवली. अफवा पसरवण्यात सनातन्यांचा हात जगात कोणीही धरणार नाहीत. सर्वात महत्वाचे -संत तुकाराम महाराजांनाच विमान न्यायला आले, तर मग आद्य शंकराचार्य, संत एकनाथ, रामदास यांना न्यायला विमान का आले नाही?. 17 व्या शतकात वैकुंठाला नेणारे सोडाच, पण चंद्रावर घेऊन जाणारे तर विमान भारतात होते का? वैकुंठाला खोटं ठरवणारे संत तुकाराम महाराजच वैकुंठाला गेले, असा प्रचार करणे, ही बाबच त्यांचा शेवट कसा झाला, हे स्पष्ट करते.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर निकाळजे**
**वरूड ( सर्कल )**




# संरक्षण विभागासाठी ६.८१ लाख कोटी

**९.५३ टक्के वाढ**



**नवी दिल्ली :** पाकिस्तान आणि चीनकडून देशाच्या सुरक्षेसमोर आव्हाने असल्याच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २०२५-२६ या वर्षासाठी सहा लाख ८१ हजार २१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यमान तरतूद ६.२२ लाख कोटी रुपये इतकी आहे त्यामध्ये पुढील वर्षासाठी ९.५३ टक्के इतकी वाढ करण्यात आली आहे.

एकूण तरतुदीपैकी एक लाख ८० हजार कोटी रुपये सशस्त्र दलाच्या भांडवली खर्चासाठी असून त्यामध्ये नवी शस्त्रे, विमाने, युद्धनौका आणि अन्य लष्करी हार्डवेअर यांच्या खरेदीचा समावेश आहे. चालू आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतुदीपेक्षा पुढील आर्थिक वर्षासाठी ९.५३ टक्के वाढ करण्यात आली असल्याचे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

नव्या लष्करी हार्डवेअरसाठी एक लाख ४८ हजार ७२२.८० कोटी रुपये खर्च केले जाणार असून ३१ हजार २७७ कोटी रुपये संशोधन, विकास आणि पायाभूत निर्मितीवर खर्च केले जाणार आहेत. त्याचप्रमाणे एक लाख ११ हजार ५४४ कोटी रुपये देशांतर्गत स्रोतांकडून होणाऱ्या खरेदीवर खर्च केले जाणार आहेत. देशांतर्गत खासगी उद्योगांकडून केल्या जाणाऱ्या खरेदीसाठी २७ हजार ८८६ कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.

सशस्त्र दलांच्या भांडवली खर्चात गेल्या वर्षीच्या तुलनेत ४.६५ टक्के इतकी वाढ करण्यात आली आहे. सुधारित भांडवली खर्च २०२५-२६साठी एक लाख ५९ हजार ५०० कोटी रुपये इतका आहे. एकूण भांडवली खर्च एक लाख ९२ हजार ३८७ कोटी रुपये इतका असून त्यापैकी १२ हजार ३८७ कोटी रुपये संरक्षण सेवेसाठी दिले जाणार आहेत.

पुढील आर्थिक वर्षासाठी दैनंदिन खर्च आणि वेतन यापोटीचा महसुली खर्च चार लाख ८८ हजार ८२२ कोटी रुपये असून त्यामध्ये एक लाख ६० हजार ७९५ कोटी रुपये निवृत्तीवेतनासाठीची तरतूद करण्यात आली आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी अर्थसंकल्पात संरक्षण विभागासाठी करण्यात आलेल्या तरतुदींचे स्वागत केले आहे. यामुळे आत्मनिर्भर भारतला मोठी चालना मिळणार आहे, असेही संरक्षणमंत्र्यांनी म्हटले आहे.

भांडवली खर्चातील ४८ हजार ६१४ कोटी रुपये विमाने आणि इंजिन यासाठी तर २४ हजार ३९० कोटी रुपये नौदल ताफ्यासाठी आहेत. सीमेवरील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि सशस्त्र दलांना भूप्रदेशातून ये-जा करणे सुलभ व्हावे यासाठी बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनसाठी सात हजार १४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाची तरतूद ९.७४ टक्के जास्त आहे.

संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेसाठीच्या (डीआरडीओ) तरतुदीमध्ये वाढ करण्यात आली असून ती २३ हजार ८५५ कोटी रुपयांवरून २६ हजार ८१६ कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे. यामधील मोठा हिस्सा म्हणजे १४ हजार ९२३ कोटी रुपये भांडवली खर्चासाठी आणि संशोधन आणि विकास प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. यामुळे डीआरडीओला आर्थिक बळ प्राप्त होईल, असे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.




# गृह विभागासाठी २.३३ लाख कोटी रुपयांची तरतूद

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पात २०२५-२६ या वर्षासाठी गृह विभागासाठी दोन लाख ३३ हजार २१०.६८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी एक लाख ६० हजार ३९१.०६ कोटी रुपये इतका मोठा वाटा सीआरपीएफ, बीएसएफ आणि सीआयएसएफ या केंद्रीय पोलीस दलांसाठी देण्यात येणार आहे. देशांतर्गत सुरक्षा, सीमा सुरक्षा आणि महत्त्वाच्या ठिकाणांच्या सुरक्षेची जबाबदारी या दलांवर आहे. गेल्या वर्षी गृहविभागासाठी दोन लाख १९ हजार ६४३.३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

अनुच्छेद ३७० रद्द करण्यात आल्यानंतर केंद्रशासित प्रदेश असलेल्या जम्मू-काश्मीरसाठी ४१ हजार ०७ कोटी रुपयांची तरतूद अर्थमंत्र्यांनी केली आहे. अंदमान-निकोबार बेटांसाठी सहा हजार २१२.०६ कोटी रुपये, चंडीगडसाठी सहा हजार १८७.४८ कोटी रुपये, दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दीवसाठी दोन हजार ७८० कोटी रुपये, लडाखसाठी चार हजार ६९२.१५ कोटी रुपये, लक्षद्वीपसाठी एक हजार ५८६.१६ कोटी रुपये आणि पुदुचेरीसाठी तीन हजार ४३२.२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

निमलष्करी दलांमध्ये सीआरपीएफसाठी ३५ हजार १४७.१७ कोटी रुपये, बीएसएफसाठी २८ हजार २३१.२७ कोटी रुपये, सीआयएसएफसाठी १६ हजार ८४.८३ कोटी रुपये, आयटीबीपीसाठी १० हजार ३७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# सीजीएसटी कायद्यातील सुधारणांचा विपरीत परिणाम

## रिअल्टी क्षेत्रातील तज्ज्ञांकडून भीती व्यक्त




**नवी दिल्ली :** सरकारने शनिवारी 'प्लांट किंवा मशिनरी' संबंधित सीजीएसटी कायद्यात पूर्वलक्षी सुधारणा प्रस्तावित केली आहे. यामुळे बांधकाम आणि व्यावसायिक मालमत्तेच्या भाडेपट्ट्यावर इनपूट टॅक्स क्रेडिट मिळवणाऱ्या रिअल इस्टेट कंपन्यांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे, असे तज्ज्ञांनी सांगितले.

इनपुट टॅक्स क्रेडिटशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (सीजीएसटी) कायद्याच्या एका कलमाअंतर्गत 'प्लांट किंवा मशिनरी' हा शब्द 'प्लांट आणि मशिनरी' ने बदलण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

सरकारने कलम १७ (५) मध्ये पूर्वलक्षी सुधारणा प्रस्तावित केली आहे, ज्यामध्ये इनपुट टॅक्स क्रेडिट कुठे लागू होणार नाही याची संपूर्ण यादी दिली आहे.

अर्थ मंत्रालयाने आपल्या अर्थसंकल्पीय दस्तऐवजात म्हटले आहे की, "कलम १७ च्या उप-कलम (५) च्या कलम (ड) मध्ये 'प्लांट किंवा मशिनरी' हा शब्द 'प्लांट आणि मशिनरी' या शब्दांऐवजी 'प्लांट आणि मशिनरी' या शब्दांमध्ये बदल केला जात आहे." कोणत्याही न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही निकाल, डिक्री किंवा आदेशात काहीही उलट असले तरी, ही सुधारणा १ जुलै २०१७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होईल, असे त्यात म्हटले आहे.

सफारी रिट्रीट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की जर इमारतीचे बांधकाम भाडेपट्ट्यावर/भाड्याने देण्यासारख्या सेवा पुरवण्यासाठी आवश्यक असेल, तर ते 'प्लांट' श्रेणीत येऊ शकते ज्यावर कलम १७(५)(डी) सीजीएसटी अंतर्गत आयटीसी (इनपूट टॅक्स क्रेडिट) चा दावा केला जाऊ शकतो. सीजीएसटी कायद्यातील प्रस्तावित दुरुस्तीवर भाष्य करताना, डेलॉइट इंडियाचे भागीदार हरप्रीत सिंग म्हणाले, जीएसटी कायद्यातील इनपूट टॅक्स क्रेडिट तरतुदींनुसार "प्लांट किंवा मशिनरी" या शब्दांऐवजी "प्लांट आणि मशिनरी" या शब्दांचा वापर करण्याच्या या पूर्वलक्षी प्रभावाने उद्योगावर विशेषतः रिअल इस्टेट लीजिंग व्यवसायातील कंपन्यांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, कारण बांधकामातील इनपुट कर हा एकूण खर्चाचा एक महत्त्वाचा भाग आहे."

ग्रँट थॉर्नटन भारतचे भागीदार आणि इंडिया इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझरी सर्व्हिसेसचे नेते कृष्णन अरोरा म्हणाले की, हा कायदेविषयक बदल सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक सफारी रिट्रीट्स प्रकरणात दिलेल्या निर्णयाला प्रभावीपणे ओव्हरराइड करतो, जिथे न्यायालयाने व्यवसायांना कार्यक्षमता चाचणी अंतर्गत 'प्लांट' म्हणून वर्गीकृत केलेल्या मालमत्तेवर आयटीसी दावा करण्याची परवानगी दिली होती.

करदात्यांच्या दृष्टिकोनातून, या दुरुस्तीचे दूरगामी परिणाम आहेत कारण ज्या उद्योगांनी सफारी रिट्रीट्सच्या निर्णयावर किंवा विद्यमान तरतुदींच्या प्रचलित व्याख्येवर आधारित त्यांचे आयटीसी दावे रचले आहेत त्यांना आता तातडीने त्यांच्या कर स्थितीचे पुनर्मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे, असे ते म्हणाले.

या दुरुस्तीच्या पूर्वलक्षी स्वरूपामुळे गंभीर आर्थिक आणि अनुपालन परिणाम होऊ शकतात. ज्यामुळे मागील काळात वाद निर्माण होण्याची शक्यता आहे, असे अरोरा म्हणाले. याव्यतिरिक्त, सर्वोच्च न्यायालयासमोर सफारी रिट्रीट्स प्रकरणात अर्थ मंत्रालयाने दाखल केलेल्या पुनरावलोकन याचिकेमुळे गुंतागुंतीचा आणखी एक थर निर्माण होतो. चालू आणि भविष्यातील खटल्यांवर त्याचा परिणाम निश्चित करण्यात या दुरुस्तीवरील न्यायालयाची भूमिका महत्त्वाची ठरेल. व्यवसायांनी सतर्क राहावे, त्यांच्या कर धोरणांचे सक्रियपणे मूल्यांकन करावे आणि जीएसटी फ्रेमवर्क विकसित होत असताना संभाव्य कायदेशीर आव्हानांचा अंदाज घ्यावा, असे ते म्हणाले.

डेलॉइटचे सिंग म्हणाले की, पूर्वलक्षी सुधारणा गेल्या वर्षी सफारी रिट्रीट प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा परिणाम रद्द करते, ज्याने कार्यक्षमता चाचणीच्या आधारे भाडेपट्टा आणि गोदाम व्यवसायांसाठी बांधकाम क्रियाकलापांवर जीएसटी क्रेडिटला परवानगी दिली होती.

वारंवार करदात्यांनी अपील केल्यानंतरही, हा बदल बांधकाम क्रियाकलापांसाठी जीएसटी क्रेडिट नाकारण्याबाबत धोरणकर्त्यांच्या कठोर भूमिकेला बळकटी देतो, सिंग म्हणाले.

## ईडीच्या तपासादरम्यान व्यावसायिकाचा मृत्यू

**मुंबईः** वक्रांगी टेक्नॉलॉजीचे दिनेश नंदवाना यांच्या अंधेरी येथील घरी ईडीची शोधमोहीम सुरू असताना अचानक त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तत्पूर्वीच त्यांचे निधन झाले. दरम्यान, ईडीच्या जालंधर कक्षाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी ११.३०च्या सुमारास त्याच्या घरी शोधमोहीम राबवण्यास सुरुवात केली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली. या कारवाईबाबत ईडीने स्थानिक पोलिसांनाही माहिती दिली होती.

## कुर्ला एलबीएस मार्गावरील भंगाराच्या दुकानांना आग

**मुंबई :** मुंबईतील कुर्ला एलबीएस मार्गावरील भंगाराच्या दुकानात सिलिंडर स्फोटामुळे आग लागली आहे. या आगीच्या भक्ष्यस्थानी चार दुकाने आली आहेत. या घटनेमुळे परिसरात दूरवरून आगीचे लोळ आकाशात जात असल्याचे पाहायला मिळत होते. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. गेल्या १५ दिवसांत दुसऱ्यांदा एलबीएस परिसरात आग लागण्याची घटना घडली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, कुर्ला पश्चिम एलबीएस मार्गावर असलेल्या शिवाजी कुटीर परिसरात सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागली. या परिसरात मोठ्या प्रमाणात विविध कारखाने आणि गोदामे आहेत. यातील एका गोदामात सिलिंडरचा स्फोट झाल्याने आग लागली. त्यानंतर काहीच वेळात ही आग वाढत गेल्याने या आगीत तीन ते चार दुकाने जळून खाक झाली .

## 'मराठी भाषा आणि स्त्री साहित्य' परिसंवाद




**मुंबई :** मराठी भाषा आणि स्त्री साहित्य या महत्त्वपूर्ण विषयावर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आज (२ फेब्रुवारी) विश्व मराठी संमेलनात परिसंवाद साधणार आहेत. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मनीषा पाटणकर-म्हैसकर (अमुस, मराठी भाषा) आणि अश्विनी भिडे (मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय, प्रसिद्ध बालरंगभूमी लेखिका प्रतिभा मतकरी, ज्येष्ठ अभिनेत्री फैयाज शेख, तसेच नामवंत लेखिका डॉ. सिसिलिया कार्व्हालो हेदेखील या चर्चासत्रात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचे निवेदन उत्तरा मोने करणार असून, मराठी भाषा, साहित्य आणि स्त्रियांचे योगदान या विषयांवर विविध पैलूंवर चर्चा होणार आहे. मराठी साहित्य आणि भाषेच्या संवर्धनासाठी आयोजित या कार्यक्रमाकडे साहित्यप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे.

## नितीन देसाई यांच्या कंपनीला हायकोर्टाचा दिलासा

### सीबीडीटीला आदेशाचा पुनर्विचार करण्याचे निर्देश



**मुंबई :** दिवंगत कलादिग्दर्शक नितीन देसाई यांची कंपनी एनडीज् आर्ट वर्ल्ड प्रायव्हेट लिमिटेडला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. आयकर विवरणपत्र भरण्यास विलंब झाल्याप्रकरणी सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसने (सीबीडीटी)यांनी जारी केलेला आदेश न्या. महेश सोनक आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने रद्द केला. तसेच सीबीडीटी ला आदेशाचा पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले

एनडीज् आर्ट वर्ल्ड कंपनीला २०२०-२१च्या मूल्यांकन वर्षासाठी आयकर विवरणपत्र भरण्यात १० महिन्यांचा विलंब झाल्याने सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसने नोटीस बजावली. कंपनीने कोविड महामारीमुळे नुकसान झाल्याचा दावा करत आयकर विवरणपत्र भरण्यात झालेल्या विलंबाबद्दल माफ करण्याची विनंती केली होती. मात्र, आयकर अधिकाऱ्यांनी कंपनीची याचिका फेटाळून लावली. त्यामुळे कंपनीने उच्च न्यायालयाचे धाव घेतली.

कंपनीच्या या याचिकेवर न्या. महेश सोनक आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी कंपनीच्या वकिलांनी आयकर खात्याच्या भूमिकेवर आक्षेप घेतला. त्यावर आयकर खात्याच्या वकिलांनी आपल्या आदेशाचे समर्थन केले. मात्र दोन्ही युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने कंपनीचा युक्तिवाद ग्राह्य धरत सीबीडीटीचा आदेश रद्द केला.

सक्षम प्राधिकरण सीबीडीटीने प्राप्तिकर कायदा, १९६१ च्या कलम ११९(२)(ब) मधील तरतुदींना अनुसरून आदेश जारी केला नाही, असे स्पष्ट करत सीबीडीटीला आदेशाचा पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले.